I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): पुणे ग्रामीण P.S. (पोलीस ठाणे): माळेगाव Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0302 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 26/10/2026 11:21 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): मधले दिवस

Date from (दिनांक पासून): 23/10/2026

Date To (दिनांक पर्यंत): 25/10/2026

Time Period (कालावधी):

Time From (वेळेपासून): 13:41 तास

Time To (वेळेपर्यंत): 14:17 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):

Date (दिनांक): 26/10/2026

Time (वेळ): 06:59 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):

Entry No. (नोंद क्र.): 005

Date and Time (दिनांक आणि वेळ): 26/10/2026 06:59 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): पश्चिम, 1 कि.मी. Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): बारामती निरा रोड,, आयटीआय गेटचे समोर,, हॉटेल शिवकृपा, माळेगाव,बारामती

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)): (महाराष्ट्र)

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): संतोष बुधा पाटील पोलीस निरीक्षक

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1981

(d) Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, पुणे शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, पुणे शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल क्र.): 91-9892753374

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | जहिर सिराज शेख वनपाल करंजे राउंन्ड ऑफीसर | | | 1. के/ऑ श्री शेखर गाडे,Town/Village (शहर / गाव): बी/5,ईशीका अपा जळोची रोड,Tehsil (तहसील): बारामती,Police Station (पोलीस ठाणे): बारामती शहर,District (जिल्हा): पुणे ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्यादी जबाब दि. 26/10/2026

मी संतोष बुधा पाटील वय 45 वर्षे पद- पोलीस निरीक्षक, नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मोबा.क्र.9892753374.

आज रोजी माळेगाव पोलीस ठाणे पुणे ग्रामीण येथे समक्ष हजर राहून सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद

देतो की, दिनांक 13/10/2026 रोजी आंम्ही आमचे कक्षात कमकाज करीत असतांना आमचे वरीष्ट श्री. वाळके . डिवायएसपी (प्रशासन), ला.प्र.वि.पुणे यांनी सुमारे 17.00 वाजता त्यांचे कक्षात बोलावून कळविले की, तक्रारदार श्री. अविनाश वामनराव गायकवाड रा. बारामती यांची एका लोकसेवका विरोधात लाच मागणीची तक्रार असल्याने कारवाई होणेकरीता त्यांनी मोबाईल नंबर 9960037306 यावरुन ला.प्र.वि.कार्यालयाचे संपर्क क्रमांकावर फोन करुन कळविले असुन दिनांक 14/10/2026 रोजी तक्रारदार हे राहत असलेले ठिकाण बारामती येथे जावुन सदर ठिकाणी त्यांना भेटुन त्यांची तक्रार ऐकुन पुढिल कायदेशिर कारवाई करा असे आदेश देवुन तक्रारदार श्री. अविनाश गायकवाड यांचा संपर्क क्रंमांक दिला. सदर कारवाईकामी पोशि/तावरे व मपोशि माकर तसेच चालक पोशि माळी यांचेसह शासकीय वाहन स्कॉपीओ क्रं. एमएच 12 व्हीजी 9264 असे उपलब्ध करुन दिले. तसेच गोपनिय कारवाईकरीता पुणे मनपा कडील 1) ज्ञानेश्वर नामदेव शेवाळे, वय- 56 वर्षे, व्यवसाय - शासकीय नोकरी, पद- वरिष्ठ लिपीक, मोटार वाहन विभाग, पुणे महानगर पालिका पुणे 2) श्री. दिपक चंद्रकात सोनवणे , वय - 52 वर्षे, व्यवसाय- शासकीय नोकरी, पद- वरिष्ठ लिपीक, सांस्कृतीक केंद्र विभाग, पुणे महानगर पालिका पुणे असे पंच दिनांक 14/10/2026 रोजी सकाळी 10.00 वा. हजर राहतील अश्या बेताने उपलब्ध करुन दिले.

सदर पंच व सापळा पथक आमचे समक्ष दिनांक 14/10/2026 रोजी 10.00 वा. हजर झाले असता आम्ही पंचांना आमचा व सापळा पथकाचा परीचय करवुन देवुन त्यांची ओळख करून घेवुन दोन्ही पंचांना व सापळा पथकास तक्रारदार श्री. अविनाश गायकवाड, रा. बारामती पुणे यांनी दिनांक 13/10/2026 रोजीचे ला.प्र.वि.पुणे येथील संपर्क क्रमांकावर फोन करुन पोलीस उपअधिक्षक श्री. वाळके (प्रशासन) यांना एका लोकसेवका विरोधात लाच मागणीची तक्रार केली असुन सदर तक्रारीबाबत बारामती येथे जावुन तक्रारदार यांची भेट घेवुन पडताळणीकामी मा. वरीष्ठांचे आदेश झाल्याने बारामती येथे जावून तक्रारदार यांची तक्रार ऐकुन त्याप्रमाणे पुढील पडताळणी व सापळा कारवाई करावयाची असलेबाबत थोडक्यात अवगत करवुन देवुन दोन्ही पंचाना सदर सापळा कारवाईत पंच म्हणुन त्यांची संमती विचारता त्यांनी पंच म्हणुन काम पाहणेस राजीखुशीन संमती दिल्याने तक्रारदार श्री. अविनाश गायकवाड यांना मोबाईल नंबर 9960037306 वर संपर्क साधुन भेटण्याचे ठिकाण विचारता तक्रारदार श्री. गायकवाड यांनी बारामती शहराबाहेर वृंदावन लॉन्स जवळ येण्यास सांगीतले. म्हणुन सदर ठिकाणी कारवाई पंचनाम्याकरीता लागणारे सिलींग लेबलींगचे साहीत्य, व्हाईस रेकॉर्डर, सिलबंद मेमरीकार्ड, लॅपटॉप , पिंरन्टर , केबल कॉर्ड, लाख, सिल, रिकामे लिफाफे, अॅन्थ्रासीन पावडरची सिलबंद शिशी, अल्ट्राव्हायलेट बॅटरी, काळा कापड, व्हिडीओ रेकॉर्डीग डिव्हाईस लावलेला शर्ट इ. सोबत घेवुन चालक पोशि माळी यांच्यासह शासकीय वाहन क्रं. एमएच 12 व्हीजी 9264 हिचेने 10.30 वा. ला.प्र.वि.कार्यालय येथुन सापळा पथक व पंचासह रवाना झालो. आम्ही सर्व पुणे सोलापुर हायवे मार्गे पाटसवरून पालखी महामार्गाने बारामतीकडे रवाना होवुन तक्रारदारास संपर्क करत पाटस बारामती रोड, वृंदावन लॉन्सजवळ 12.30 वा. च्या सुमारास पोहोचल्यावर नियोजित जागी शासकीय वाहन क्र. एमएच 12 व्हीजी 9264 हिचेत थांबले असल्याचे कळविले असता सुमारे 13.30 वा. च्या सुमारास तक्रारदार श्री. गायकवाड हे लाल रंगाची निस्सान कंपनीची कार क्रमांक एमएच 12 केजे 4582 हिचेने सदर ठिकाणी आले असता आंम्ही त्यांचे नांव विचारता त्यांनी आपले नांव अविनाश गायकवाड असे सांगीतले.

तक्रारदार यांना आंम्ही शासकीय वाहनात बसवुन आमचा तसेच सापळा पथक व पंचासह परीचय करवुन देवुन त्यांचे नांव गांव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव श्री अविनाश वामनराव गायकवाड, वय-60, शिक्षण एलएलबी धंदा- शेती व वकीली रा. सुशीला निवास मोरयानगर, बारामती, जि. पुणे असे सांगितले त्यानंतर तक्रारदार श्री गायकवाड यांना त्यांची तक्रार तोंडी कथन करण्यास सांगितली असता तक्रारदार श्री गायकवाड यांनी त्यांची तक्रार दोन्ही पंचासमक्ष तोंडी कथन केली. त्यांची तोंडी तक्रार लोकसेवक वनपाल श्री. शेख, बारामती वन विभाग यांच्या विरोधात लाच मागणीची असल्याने त्यांना सदरची तक्रार लेखी लिहुन घेणेकरीता तसेच सापळा पथक थांबलेले नमुद ठिकाणी लोकांची व वाहनाची वर्दळ असल्याने तक्रारदार यांनी त्याचे ऑफीस गाळा नं एफ-111 , शेठ रामचंद मुलचंद कॉम्पेलेक्स , तिरंगा सर्कल बारामती या ठिकाणी जावुन लेखी स्वरुपात लिहुन देतो अशी विनंती केली. त्यानुसार सर्वानुमते नमुद ठिकाणी जावुन पुढील कारवाई करण्याचे ठरले.

त्याप्रमाणे आंम्ही सापळा पथकासह शासकीय वाहनाने तसेच तक्रारदार हे त्यांच्या खाजगी वाहनाने सदर ठिकाणाहुन रवाना होवुन तक्रारदार यांच्या चारचाकी वाहना मागोमाग राष्ट्रवादी कॉंग्रेस कार्यालयाजवळील मोकळे पटांगण, शेठ रामचंद मुलचंद कॉम्प्लेक्सच्या बाजुला, तिरंगा सर्कल बारामती येथे पोहोचुन वाहनातुन उतरुन तक्रारदाराच्या मागोमाग कोणास संशय येणार नाही अश्या पद्धतीने लाच मागणी कारवाईचे आवश्यक जुजबी साहीत्य सोबत घेवुन पंच व सापळा पथकासह चालत त्यांच्या गाळा नं एफ-111, शेठ रामचंद मुलचंद कॉम्प्लेक्स, तिरंगा सर्कल, बारामती या ऑफीसमधे 14.00 वा. पोहोचलो. सदर ठिकाणी पुन्हा एकदा तक्रारदार श्री. गायकवाड यांना आंम्ही तक्रारीबाबत विचारपुस करता तक्रारदार यांनी त्यांची तक्रार थोडक्यात कथन केली. तक्रारदार श्री. गायकवाड यांना सदर लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असल्याने आंम्ही पंच, तक्रारदार यांना अॅन्टी करप्शन विभागाकडून करण्यात येणा-या पडताळणी व सापळा कार्यवाहीबाबतची सविस्तर माहिती दिल्यावर पुढील लाच मागणी पडताळणी व सापळा कारवाईकामी पंच क्र.1 म्हणून श्री ज्ञानेश्वर नामदेव शेवाळे व पंच क्र.2 म्हणून श्री दिपक चंद्रकात सोनवणे काम पाहितील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री. गायकवाड यांना त्यांची तक्रार लिहुन देणेस सांगीतले असता तक्रारदार श्री. गायकवाड यांनी त्यांची लेखी तक्रार पंचांसमक्ष स्व:हस्ताक्षरामध्ये लिहून दिली ती पुढीलप्रमाणे-

"मी विनंती तक्रारी अर्ज करतो की, मी वरील पत्यावर माझी पत्नी मुलगा व सुनेसह राहणेस असुन मी बारामती सत्र न्यायालयात वकीली करतो तसेच को-हाळे खुर्द येथे गट नं. 12/2 मध्ये माझ्या मालकीची 4 हेक्टर जमीन असून त्या शेतजमिनीत शेती करुन माझा व माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करतो. माझी सदरची शेती ही निरा नदीच्या किना-यावर आहे.

माझ्या वर नमुद प्रमाणेच्या शेतजमिनीतील माती निरा नदीला पावसाळ्यात आलेल्या पुरामुळे वाहुन गेली. यापुर्वी देखील माझ्या शेतात नदीच्या पुराचे पाणी घुसुन माती वाहुन गेल्याने शेतीचे नुकसान झाले होते. म्हणुन मी मा. तहसिलदार, बारामती विभाग, यांना दिनांक 25/08/2026 रोजी व तत्पुर्वी लेखी अर्जाद्वारे माझ्या शेतीच्या लागुन असलेल्या ओढा व नदीपात्रातुन माझ्या शेतजमिनीची वाहुन गेलेली व सदर नदीपात्रात गोळा झालेली माती शेतजमिन दुरुस्तीकरीता उचलण्याची परवानगी मिळण्यासाठी विनंती केली होती. सदर वेळी तहसिलदार बारामती यांनी मला सदर कामासाठी शासनाची लेखी परवानगीची आवश्यकता नसुन केवळ आपण दिलेल्या लेखी

अर्जाच्या पोहचच्या आधारे शेतजमिन दुरुस्तीकरीता माती घेवु शकता असे सांगीतले. म्हणुन मी माझ्या वर नमुद प्रमाणेच्या शेतजमिनीमध्ये नदीपात्रातील माती टाकण्यासाठी श्री. शुभम भोसले रा. होळ , बारामती यांना सदरचे काम करण्यास सांगुन दि.14/09/2026 रोजी पासुन त्यांच्या जेसीबी व ट्रॅक्टरव्दारे काम सुरु केले.

दिनांक 26/09/2026 रोजी माझ्या वर नमुद प्रमाणे जागेत नदीपात्रातील माती भरावाचे काम सुरु असताना मला जेसीबी मालक श्री. शुभम भोसले यांचा दुपारी 3 च्या सुमारास फोन आला व त्यांनी मला को-हाळे येथील शेतामधील माती भरावाचे काम फॉरेस्टच्या मॅडमनी बंद पाडले आहे तुंम्ही लगेच इकडे या असे सांगीतल्याने मी बारामतीवरुन को-हाळे खु. येथील माझ्या शेतात गेलो असता तिथे श्री. शुभम भोसले, त्याचा जेसीबी ऑपरेटर, ट्रॅक्टरचालक तसेच माझा गडी दत्ता मदने असे तसेच मी ओळखत असलेले फॉरेस्ट वनपाल श्री. शेख व त्यांच्या सोबत एक मॅडम असे माझ्या शेतात होते. त्यांना मी भेटल्यावर वनपाल श्री. शेख साहेब यांनी मला त्यांच्या सोबतच्या फॉरेस्टच्या पल्लवी भुमरे मॅडम असल्याचे सांगुन माझ्या शेतात फॉरेस्ट मालकीच्या जागेतील माती टाकत असल्याची त्यांच्याकडे तक्रार आल्याने ते कारवाईसाठी आल्याचे सांगीतले. त्यावर मी त्यांना मा.तहसिलदार साहेबांना मी अर्ज करुन शेतजमिनीत वाहुन गेलेली माती भरणा करीत असल्याचे सांगीतले असता त्यांनी नदीपात्राची जागा फॉरेस्टच्या मालकिची असल्याचे सांगुन आंम्हाला माती भरावाचे काम बंद करण्यास सांगीतले. मी त्यांना काम बंद न पाडण्याबाबत विंनंती केली असता श्री. शेख साहेब वनपाल यांनी मला बाजुला घेवुन "काम सुरु ठेवायचे असेल तर भुमरे मॅडम आणी माझे मिळुन 10,000/-रुपये लगेच द्या आंम्ही कारवाई करणार नाही" असे सांगीतले. म्हणुन मी घाबरुन त्यांना कारवाई न करण्याची विंनंती केली असता त्यांनी मला पैसे दिल्याशिवाय काम सुरु करून नका असे सांगीतल्याने मी भितीपोटी त्यांना 4000/- रुपये दिले होते. यानंतर मी त्यांना वेळोवेळी काम सुरु करु देणेची विंनती केली असता श्री. शेख साहेब व भुमरे मॅडम यांनी मला काम सुरु करु दिले नाही. म्हणुन मी दिनांक 07/10/2026 रोजी मा.वनपरीक्षेत्र अधिकारी, बारामती यांना त्यांच्याकडील नाहरकत परवाना मिळण्यासाठी लेखी अर्ज केला असता मला दिनांक 12/10/2026 रोजी दुपारी 2 च्या सुमारास वनपाल श्री. शेख यांचा मोबाईल नंबर 8767172098 यावरुन माझ्या मोबाईलवर फोन आला . त्यांनी मला फोनवरुन "तुंम्ही अर्ज कशाला केलात, मॅडमचे आणी माझे 6000/- रुपये देवुन टाका आंम्ही जागेवर येवुन परवानगी देवुन टाकतो" असे सांगीतले. त्यावर मी त्यांना आपले काम लीगल आहे म्हणुन नीरा नदीपात्रातुन माती वाहून नेण्यासाठी परवानगीसाठी अर्ज देवुन काम करतो असे सांगीतल्यावर त्यांनी मला "मला परवा ऑफीसमध्ये येवुन भेटा आणि अर्ज माघारी घ्या. तुंम्ही 6,000/- द्या आंम्ही परमिशन देतो" असे सांगुन मला भुमरे मॅडम व त्याच्याकरीता उर्वरीत 6000/- रुपये लाचेची मागणी करुन दिनांक 14/10/2026 रोजी त्यांच्या बारामती येथील ऑफीसमधे पैसे घेवुन बोलावले आहे.

बारामती वनपाल श्री. शेख साहेब यांनी माझ्याकडे मागणी केलेली रक्कम हि कोणतीही शासकीय फी नसुन लाच असल्याची माझी खात्री असून ती मला त्यांना देण्याची इच्छा नसल्याने मी त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांच्या मोबाईल संपर्क क्रमांकावर दिनांक 13/10/2026 रोजी संध्याकाळी फोन करुन तक्रार कळविली आहे. श्री. शेख वनपाल, तसेच श्रीमती पल्लवी भुमरे मॅडम फॉरेस्ट ऑफीसर बारामती यांचे व माझे कोणतेही आर्थिक वाद विवाद नसुन आमचेत कोणतेही

भांडण तंटे अथवा पुर्ववैमनस्य नाही. तरी त्यांचे विरुध्द कारवाई होणेस विनंती आहे."
वैगेरे मजकुराची तक्रारदार यांनी लेखी तक्रार लिहुन त्यावर दिनांकीत स्वाक्षरी करुन तक्रारीसोबत वनपरीक्षेत्र कार्यालय बारामती यांना दिनांक 07/10/2026 रोजी केलेला अर्ज, तसेच तहसिलदार बारामती यांना यापुर्वी केलेले अर्ज यांच्या छायांकीत प्रती अर्जासोबत सादर केल्याने आंम्ही सदर तक्रार वाचून पंचांना वाचणेस दिली असता तक्रारदार श्री. गायकवाड यांनी तोंडी कथन केलेली तक्रार व लेखी तक्रार एकच मजकुराची असल्याची पंचांनी वाचुन खात्री करुन सदर हस्तलिखीत तक्रार व त्यासोबतच्या कागदांवर आंम्ही व पंचांनी स्वाक्ष-या करुन सदर तक्रार ताब्यात घेतली.

त्यानंतर तक्रारदार श्री गायकवाड यांना पंच क्र. 1 शेवाळे यांचेसोबत वन विभाग बारामती ऑफीसमधे पाठवुन तेथे लोकसेवक श्री. शेख वनपाल यांची भेट घेवुन तक्रारदार श्री गायकवाड यांचेकडे लोकसेवकाची लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबत पुढील पडताळणी कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तक्रारदार यांचे ऑफीस लहान असल्याने तसेच इतर गाळेधारक दुकानदार व लोकांची गर्दी वर्दळ जास्त होवु लागल्याने पुढील कारवाईची गोपनियता राहावी म्हणुन पंच, सापळा पथक व तक्रारदार असे बारामती-भिगवन रोडच्या निर्जनस्थळी जावुन पुढिल कारवाई करण्याचे सर्वानमुते ठरवुन पंच, तक्रारदार, सापळा पथक असे तक्रारदाराच्या कार्यालयातुन बाहेर पडुन सापळा पथक, पंच व आंम्ही शासकीय वाहनात बसुन तसेच तक्रारदार हे त्यांच्या कारमधे बसल्यावर तक्रारदाराच्या वाहना मागोमाग 17.15 वा. रवाना होवुन बारामती भिगवन रोड लगत संयोग भवन शेजारुन रेल्वेकडे जाणा-या रस्त्याच्या मोकळ्या जागेत पोहोचलो. सदर ठिकाणी तक्रारदार त्यांची निसान कार थांबवुन पार्क करुन खाली उतरले असता आमच्या सुचनेवरुन सदर वाहनाशेजारी चालक पोशि/माळी यांनी शासकीय वाहन पार्क केले. ती वेळ 17.40 अशी होती. त्यानंतर आंम्ही चालक पोशि माळी यांनी खाली उतरवुन तक्रारदार श्री. गायकवाड यांना शासकीय वाहन क्र. एमएच 12 व्हीजी 9264 हिचेत बसवुन सदर ठिकाणी पुढील कारवाई बाबत सर्वांना कळवुन तक्रारदार श्री. अविनाश गायकवाड, सापळा पथक व दोन्ही पंचांना पडताळणी वेळी घ्यावयाच्या दक्षतेच्या सविस्तर सुचना दिल्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयाकडून करण्यात येणा-या पडताळणी व सापळा कारवाईबाबत माहीती देवुन निवेदनांचे चित्रीकरणबाबत माहीती दिली. तसेच लोकसेवक व तक्रारदार यांचे भेटीच्या वेळी होणारे संभाषण हे आमचेकडील सोनी कंपनीचे व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्डींग केले जाणार असलेबाबत त्यांना कळवुन आमचेकडील ट्रॅपबॅग साहित्यामधून सोनी कंपनीचा व्हॉईस रेकॉर्डर काढून सदर व्हाईस रेकॉर्डरच्या कार्यपद्धतीची त्यांना माहीती दिली. यानंतर नवीन सिलंबद पाकिटामधील मेमरीकार्ड काढुन त्याचे पुढील बाजुस M ROCK 32 GB Micro SD HC I 10C व मागील बाजुस A2416MN004085154 MR-XY07/26 असे पंचांना व तक्रारदारास दाखवुन सदरचे मेमरी कार्ड सोनी कंपनीच्या व्हाईस रेकॉर्डरमधे टाकुन व्हाईस रेकॉर्डर ऑन करुन त्यात रेकॉर्डींग होणारे संभाषण मेमरीकार्ड मेमरीमध्ये सेव्ह होण्याची सेटींग करुन सदर व्हाईस रेकॉर्डर व मेमरीकार्डात पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत नसल्याची पंचाची व तक्रारदार यांची खात्री करुन सदर व्हॉईस रेकॉडर पोशि तावरे यांचे ताब्यात दिला. यानंतर पडताळणी निवेदनांचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येणार असल्याने मी ट्रॅपबॅगमधील नविन पॅकबंद मेमरीकार्ड बाहेर काढुन सदर मायक्रो एस.डी.कार्डचे सिलबंद पॅकिंग उघडुन पंचांना दाखविले ते सायस्टीक

कंपनीचे 08 जीबी क्षमतेचे मायक्रो एस.डी.कार्ड असून त्याचे पुढील बाजूस Systic Micro SD HC c10 8GB व मागील बाजूस CE MMFC215SAN-TO ZC SY-Z8/26 Made in Taiwan असे असल्याचे दिसून आले. सदरचे मेमरीकार्ड मपोशि माकर यांच्या व्हिवो मोबाईल हॅन्डसेटमधे टाकुन सदर मेमरीकार्डात पुर्वी कोणीतेही व्हिडीओ रेकॉर्डींग नसल्याची पंचांची व तक्रारदाराची खात्री करवुन सदर मोबाईलमधे रेकॉर्डीग होणारे व्हिडीओ मेमरीकार्ड मेमरीमधे सेव्ह होण्याची सेटींग करुन सदर मोबाईल फ्लाईट मोडमधे टाकुन मपोशि माकर यांच्या ताब्यात देवुन निवेदन घेतेवेळी त्यांना सदर मोबाईलमधे चित्रिकरण करण्यास सांगीतल्यावर आमच्या सुचनेवरून पोशि तावरे यांनी 17.50 वाजता व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार श्री गायकवाड व त्यानंतर पंच क्रं 1 श्री. शेवाळे व पंच क्र. 2 श्री. सोनावणे यांची पडताळणी कारवाई करीताची निवेदने व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करुन व्हॉईस रेकॉर्डर 17.57 वा. बंद केला. सदरवेळी मपोशि माकर यांनी त्यांचेकडील व्हिवो मोबाईल हॅन्डसेटद्वारे चित्रिकरण केले.

यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. शेख यांना भेटायला जाण्यापुर्वी त्यांनी कॉल करणेस सांगीतलेले होते म्हणुन त्यांना मोबाईलवर कॉल करुन विचारतो असे सांगीतल्याने सर्वानुमते लोकसेवक श्री.शेख यांना तक्रारदाराने कॉल करुन ते जेथे भेटायला बोलवतील त्याठिकाणी पंच क्र. 1 यांचेसह जावे असे ठरविण्यात आले. यानंतर आंम्ही तक्रारदार यांना लोकसेवक श्री. शेख यांना कॉल करतांना आपल्या मोबाईल फोनचा स्पिकर ऑन करुन बोलणे करावे असे सांगीतल्यावर आमचे सुचनेवरुन पोशि तावरे यांनी 18.00 वा. व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन तो तक्रारदार यांचे समक्ष धरला असता तक्रारदार श्री. गायकवाड यांनी त्यांचे मो क्र. 9960037306 यावरुन लोकसेवक श्री शेख यांचे मो क्र 8767172098 यावर नॉर्मल केला असता लोकसेवक श्री. शेख यांनी कॉल उचलला नाही . पुन्हा 18.19 वा. व्हाईस रेकॉर्डर सुरु केल्यावर तक्रारदार यांनी त्यांचे मो क्र. 9960037306 वरुन लोकसेवक श्री. शेख यांचे मो.क्र. 8767172098 यावर नॉर्मल केला असता त्यांनी कॉल उचलला नाही. याचवेळी 18.20 वाजे सुमारास लोकसेवक श्री शेख यांचा मोबाईल नंबर 8767172098 यावरुन तक्रारदार यांना त्यांचा मोबाईल नंबर 9960037306 यावर कॉल आल्याने आंम्ही लागलीच पोशि तावरे यांना व्हाईस रेकॉर्डर चालु करण्याची सुचना देवुन तक्रारदार यांना नमुद कॉल स्पिकर ऑन करुन बोलणे करणेस सांगीतले असता पोशि तावरे यांनी 18.20 वा. च्या सुमारास व्हाईस रेकॉर्डर ऑन करुन तक्रारदार यांचे समक्ष धरला असता तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. शेख यांचा आलेला कॉल रिसीव्ह करुन स्पीकर ऑन करुन बोलणे केले. सदर वेळी तक्रारदार श्री. गायकवाड हे लोकसेवक शेख यांना नमस्ते... ते गेले का अधिकारी त्यावर लोकसेवक श्री शेख म्हणाले गेले गेले..गेले ना त्यावर तक्रारदार म्हणाले पण ते थांबल होत साहेब थोडसं दिला वेळ ही तर बर होईल...एक पाच मिनिट वेळ दया त्यावर लोकसेवक श्री शेख म्हणाले नाय नाय वेळ दयायचा विषय नाहीए साहेब काय होतयं ते बॅक टु बॅक या आठवडयात ब-याच घटना..म्हणजे घडल्यात पहिलं ऑडीट आलं परत हे हा विषय आला त्यावर तक्रारदार म्हणाले हां म्हणाले त्यावर लोकसेवक श्री शेख म्हणाले ती एरिगेशनची हद्द दाखविली पण ते ऐरिगेशनच काय तिथ दिसत नाईये मला . नकाशात असा विषय आहे...म्हणून थांबवल दुसर काही हेतु नाही माझा. त्यावर तक्रारदार म्हणाले काय झालय साहेब सव्हीस तारेखपासन आज जवळजवळ वीस दिवस सगळच थांबलय ठप्प ते आमचे चुलते पण

माझ्यावर संशय घ्यायला लागलेत ते म्हणले तुला नोटीस दिली तर दाखव मला आता मी म्हणल आवो ते संबंधायत साहेब आपले जवळचे आहेत आणि त्याच्यामुळं त्यावर लोकसेवक श्री शेख म्हणाले नाय नोटीसचा विषय नाहिचय..मुळात आता कसं झाल माहितेका तो नोटीसचा विषय नाहीच नव्हताच तिथं ॲक्चुली कारवाईचा विषय होता , नाय काही गोष्टी मला साईटवर बोलायच्यात साहेब त्याच्यामुळ मी साईटीवर म्हटल साहेब तुम्हाला .. आल का लक्षात आणि त्यात एसआयटीची मोहिम चालु होणार आहे..क्लिअर मंग मला आत्ता काही क्लिअर करता येईना तुम्हाला मी एकदा बघुन घेतो त्यावर तक्रारदार म्हणाले ते कधी .. मला फक्त कधी भेटायच सांगा त्यावर लोकसेवक म्हणाले नाय नाय आज... करतो.. प्रयत्न करतो यस त्यावर तक्रारदार ठीकये असे म्हणुन फोन कट केला.

सदरवेळी पडताळणी दरम्यान तक्रारदार श्री. गायकवाड व लोकसेवक श्री. शेख यांचेत फोनवर झालेल्या संभाषणामध्ये तक्रारदार गायकवाड व लोकसेवक शेख यांचेत तक्रारदार यांचे कामासंदर्भाने चर्चा झाली. त्यात लोकसेवक शेख यांची एसआयटी ची मोहिम चालु होणार असुन त्यांना काही क्लिअर करता येईना ते एकदा बघुन घेतो आणि तुम्हाला सांगतो तसेच काही गोष्टी साईटवर बोलायच्यात साहेब असे बोलल्याचे निष्पन झाले. झालेल्या संभाषणामध्ये लोकसेवक शेख यांनी तक्रारदार यांच्याकडे कोणतेही लाचेची स्पष्ट मागणी केली नाही मात्र त्यांनी साईटवर म्हणजेच तक्रारदार यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेट देवुन सविस्तर बोलतो असे सांगीतल्याने तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा केली असता तक्रारदार श्री. गायकवाड यांनी लोकसेवक श्री. शेख कॉल करुन शेतावर प्रत्यक्ष भेट देवुन सविस्तर बोलण्याकरीता भेटायला बोलवतील त्यावेळी त्यांच्याकडुन स्पष्ट लाच मागणीचे बोलणे होण्याची शक्यता असल्याची माझी खात्री आहे. म्हणुन शेख साहेबांचा मला निरोप आला की आपल्याला मी फोन करुन कळवितो त्यावेळी आपण पुढील कारवाई करावी असे सांगीतल्याने पुढील कारवाई तक्रारदार यांचा फोन आलेनंतर करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात येवुन दिनांक 14/10/2026 रोजीची कारवाई तात्पुरती स्थगीत करुन नमुद कारवाईबाबत गोपनीयता राखणेच्या सुचना तक्रारदार, पंच व पथकास देवुन तक्रारदारास रवाना केल्यावर आम्ही , पंच, सापळा पथक 18.30 वा शासकिय वाहन क्रं. एमएच 12 व्हीजी 9264 हिचेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयाकडे रवाना होवुन लाप्रवि कार्यालय पुणे येथे पोहोचुन पंचांना व सापळा पथकास गोपनियतेच्या सुचना देवुन सविस्तर पडताळणी पंचनामा 23.15 वा. पावेतो पुर्ण केला.

दिनांक 16/10/2026 रोजी 10.46 वा. च्या सुमारास आंम्ही ला.प्र.वि.कार्यालय पुणे येथे हजर असतांना तक्रारदार श्री. गायकवाड यांचा आंम्हाला मिसकॉल अॅलर्ट आल्याने आंम्ही त्यांना 10.52 वा. कॉल करुन विचारणा केली असता त्यांनी आंम्हास कळविले की, त्यांच्या शेतात माती भरावाचे काम करणारा जेसीबी मालक शुभम भोसलेने फोनवरुन कळविले की "मला श्री. शेख साहेब यांचा कॉल आला होता. त्यांनी मला सांगीतले की मी उद्या गायकवाडांच्या शेतावर को-हाळे येथे दुपारी येणार असुन त्यांनी तुंम्हाला तेथे भेटायला बोलवले आहे." त्यामुळे माझी व श्री. शेख साहेबांची भेट उद्या म्हणजे दि.17/10/2026 रोजी को-हाळे,(खु.) वडगांव येथे होणार आहे तरी आपण सकाळी 11.00 वा. च्या सुमारास को-हाळे खु. वडगांव येथे पोहोचा मी रस्त्यात आपणास नक्की भेटण्याचे ठिकाण कळवितो. असे सांगीतल्याने आंम्ही तक्रारदार यांना 13.00 वा. पुन्हा कॉल करुन लोकसेवक श्री. शेख यांची भेट होण्याचे ठिकाणाची खात्री करुन आमचे कार्यालयातील उपस्थीत पंच

व सापळा पथकास वरील प्रमाणे घडलेल्या घडामोडींची माहीती देवुन दिनांक 17/10/2026 रोजी या कार्यालयात सकाळी 07.45 वा. हजर राहण्याच्या सुचना दिल्या.

दिनांक 17/10/2026 रोजी 07.45 वा. दोन्ही पंच व सापळा पथक असे ला.प्र.वि.कार्यालय पुणे येथे हजर आल्यावर पंचांना व सापळा पथकास पुनश्च एकमेकंाचा परीचय देवुन त्यांना पडताळणी पंचनाम्याची उजळणी करुन देवुन आंम्ही , पंच व सापळा पथक असे शासकिय सुमो वाहन क्रं. एमएच 12 एनयु 5882 हिचेने चालक पोशि माळी यांच्यासह 08.00 वा. पंचनाम्याचे व सिलीगं लेबलींगचे साहीत्य, अॅन्थ्रासीन पावडरची सिलबंद शिशी, अल्ट्राव्हायलेट बॅटरी, लाख, सिल , लॅपटॉप, पिंंरन्टर, केबल, कार्ड रिडर, पडताळणी पंचनाम्यात वापरण्यात आलेले व सिलबंद केलेले मेमरी कार्डचे सिलबंद पाकीटे इ. सह रिकामे लिफाफे, गोंद व आवश्यक इतर स्टेशनरी साहीत्यासह रवाना झालो. आम्ही सर्व को-हाळे खुु वडगांव कडे रवाना होवुन प्रवासादरम्यान तक्रारदारास भेटण्याचे ठिकाण विचारता त्यांनी वडगांवच्या जवळ आल्यावर फोन करणेस कळविल्याने आंम्ही जेजुरीपर्यंत पोहोचलो असता तक्रारदार श्री. गायकवाड यांचा 10.20 वा. च्या सुमारास आंम्हाला कॉल आला व त्यांनी कळविले की श्री. शेख साहेब यांनी शुभम भोसले याला फोनवर सांगीतले की, खांडसच्या जवळ बिबट¬ाने हल्ला केलेला असुन तेथे त्यांची रात्रभर ड¬ुटी लागलेली होती यामुळे त्यांचे को-हाळे येथे येणे होणार नाही. ते रविवारी नक्की येतो व विषय मार्गी लावुन देणार असे म्हणल्याचे त्याने सांगीतल्याने खांडस येथे बिबट¬ाने हल्ला केल्यामुळे वनपाल श्री. शेख यांची ड¬ुटी लागल्याने आमची आज भेट होणार नाही. त्यामुळे आपण पुढिल कारवाई रविवार दि.18/10/2026 रोजी मी शेख साहेबांना फोन करुन वेळ घेतल्यावर आपणास कळवल्यावर को-हाळे खु. येथे भेटुन करु असे तक्रारदार यांनी पंचांसमक्ष कळविल्याने आंम्ही सर्वानुमते दिनांक 18/10/2026 रोजी पुढिल कारवाई करण्याचे ठरवुन जेजुरी येथुन ला.प्र.वि. पुणे येथे 13.10 वा. परत आल्यावर पंचांना व सापळा पथकास दि.18/10/2026 रोजी सकाळी 08.00 वा. ला.प्र.वि.कार्यालय पुणे येथे हजर राहण्यास सांगुन गोपनियतेच्या सुचना दिल्या.

दिनांक 18/10/2026 रोजी 08.00 वा. पंच क्रं. 1 श्री. शेवाळे, व इतर सापळा पथक आमचेसह असे ला.प्र.वि.कार्यालय पुणे येथे उपस्थित झाले. परंंतु पंच क्र. 02 श्री. सोनवणे आजारी असल्याने त्यांना दवाउपचार घेणे अत्यंत अत्यावश्यक असल्याने ते पुढिल कारवाई करीता उपस्थित राहु शकत नसल्याचे त्यांनी कळविले म्हणुन आंम्ही तात्काळ मा.वरीष्ठांना सदर बाबत अवगत केले असता त्यांनी ला.प्र.वि.पुणे येथे कारवाईकामी पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील राखीव असलेले पंच श्री. संदिप गायकवाड हे उपलब्ध करुन दिले. पंच श्री. संदिप गायकवाड हे आमचे समक्ष 10.00 वा. हजर आल्यावर त्यांना आंम्ही आमचा, सापळा पथकाचा तसेच पंच क्रं. 1 श्री. शेवाळे यांचा परीचय करुन देवुन त्यांचा सर्वांना परीचय करुन दिला. यानंतर आंम्ही सदर पंचांना तक्रारदार यांचे तक्रारीबाबत थोडक्यात कळवुन त्यांना पंच क्रं. 2 म्हणुन काम करणेस त्यांची संमती विचारता त्यांनी राजीखुशीने संमती दिल्याने आंम्ही त्यांना तक्रारदार श्री. अविनाश गायकवाड यांनी दिलेली लेखी तक्रार व सोबतचे सहपत्रे वाचणेस देवुन सदर तक्रारीच्या अनुषंगाने करणेत आलेल्या पंचनामा कार्यवाहीची व घडामोडींची सविस्तर माहीती दिली. यानंतर काहीवेळाने आंम्हास तक्रारदार श्री. गायकवाड यांनी पंचांसमक्ष फोन करुन कळविले की त्यांनी श्री. शेख वनपाल यांना फोन करुन त्यांचे भेटीची वेळ विचारली असता श्री. शेख यांनी त्यांना कळविले की कांबळेश्वर येथे बिबट¬ाचे

अस्तित्व दिसुन आल्याने ते कालपासुन नाईट ड्युटीवर आहेत. त्यामुळे आज त्यांची भेट होणार नाही उद्या परीस्थीती पाहुन कळवितो असे सांगीतले असुन त्यांची वेळ मिळाली कि मी आपणास कळवितो असे सांगीतले. म्हणुन आंम्ही तक्रारदारास श्री. शेख यांचेकडुन भेटीची वेळ निश्चीत मिळाल्यावर आंम्हास तात्काळ संपर्क साधणेबाबत कळवुन पंच व सापळा पथकास दिनांक 19/10/2026 रोजी सकाळी 09.45 वा. या कार्यालयात हजर राहण्याच्या व गोपनियतेच्या सुचना दिल्या.

दिनांक 19/10/2026 रोजी दोन्ही पंच व सापळा पथक असे ला.प्र.वि.पुणे येथे 09.45 वा. आमचे समक्ष हजर झाले असता त्यांना झालेल्या घडामोडींबाबत पुनश्च अवगत करवुन देवुन तक्रारदार यांना आंम्ही कॉल करुन माहीती घेता 12.25 वा. च्या सुमारास तक्रारदार श्री. गायकवाड यांनी आंम्हाला कळविले की, श्री. शेख यांचेसोबत त्यांचे फोनवरुन बोलणे झाले असता श्री. शेख यांना ड्युटीमुळे आज व उद्या शासकीय सुट्टीमुळे भेटणे होणार नाही. ते बुधवारी शेतावर दुपारी 12.00 वा. ते 01.00 च्या सुमारास भेटतो असे म्हणले आहेत. त्यामुळे त्यांची आज भेट होणार नाही असे तक्रारदाराने कळविल्याने सर्वानुमते कारवाई स्थगीत करण्यात येवुन पंचांना दिनांक 21/10/2026 रोजी सकाळी 09.45 वा. या कार्यालयात हजर राहण्याच्या व गोपनियतेच्या सुचना दिल्या. सदर सुचनांच्या अनुषंगाने दिनांक 21/10/2026 रोजी सकाळी 09.45 वा. पंच, सापळा पथक व आंम्ही ला.प्र.वि.कार्यालय पुणे येथे हजर होवुन या कारवाई दरम्यान घडलेल्या घडामोंडींची पुनश्च उजळणी केली असता 10.35 वा. च्या सुमारास आंम्हास तक्रारदार श्री. अविनाश गायकवाड यांचा फोन आला व त्यांनी कळविले की श्री. शेख साहेब, वनपाल यांनी शुभम भोसले याला फोन करुन कळविले की काल रात्री त्यांच्या पथकाने खांडस येथे बिबट्याला जेरबंद केले असुन सदर बिबट्याच्या पुढिल तजविज कामी त्यांना आज दिवसभर काम असल्याने ते आंम्हाला उद्या भेटणार आहेत. तक्रारदाराने असे कळविल्याने त्यांना उदयीक रोजी स्वता श्री. शेख यांना कॉल करुन नक्की भेटण्याचे ठिकाण व वेळ निश्चीत करुन आंम्हास कळविणेबाबत सुचना देवुन सर्वानुमते आजची कारवाई स्थगीत करण्यात येवुन पंचांना दिनांक 22/10/2026 रोजी सकाळी 09.45 वा. या कार्यालयात हजर राहण्याच्या व गोपनियतेच्या सुचना दिल्या.

दिनांक 22/10/2026 रोजी सकाळी 09.45 वा. पंच, सापळा पथक व आंम्ही ला.प्र.वि.कार्यालय पुणे येथे हजर झाले असता या कारवाई दरम्यान घडलेल्या घडामोंडींची पुनश्च उजळणी केली. आंम्ही पंचांसह कार्यालयात हजर असतांना 12.08 वा. च्या सुमारास आंम्हास तक्रारदार श्री. गायकवाड यांचा फोन आला व त्यांनी कळविले की श्री. शेख साहेब, वनपाल यांना कॉल केला असता ते दुपारच्या सेशनमधे निघतो असे म्हणले परंतु नक्की वेळ कळविले नाहीत, मी नक्की वेळ आपणास कळवितो असे बोलुन पुन्हा काहीवेळाने तक्रारदार श्री. गायकवाड यांनी फोन करुन कळविले की श्री. शेख साहेबांशी फोनवरुन बोलणे झाले असता त्यांना अचानक काम लागल्याने ते मला उद्या सकाळीच्या सेशनमधे 11.00 ते 12.00 वा.च्या दरम्यान कठीणपुल येथे नक्की भेटतो असे म्हणले आहेत. असे तक्रारदाराने कळवुन उद्या सकाळी 10.30 ते 11.00 वा. पर्यंत वडगांव येथे पोहोचल्यावर भेटुन पुढिल कारवाई करु असे आंम्हास कळविल्याने त्यांना उदयीक रोजी सकाळी 11.00 वा. वडगांव येथे पाहोचण्याची सुचना देवुन सर्वानुमते आजची कारवाई स्थगीत करण्यात येवुन पंचांना व सापळा पथकास दिनांक 23/10/2026 रोजी सकाळी 08.30 वा. या कार्यालयात हजर राहण्याच्या व

गोपनियतेच्या सुचना दिल्या.

आंम्ही दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने दिनांक 23/10/2026 रोजी सकाळी 08.30 वा. पंच, सापळा पथक व आंम्ही ला.प्र.वि.कार्यालय पुणे येथे हजर होवुन या कारवाई दरम्यान घडलेल्या घडामोंडींची पुनश्च उजळणी करुन आंम्ही , पंच व सापळा पथक असे शासकिय सुमो वाहन क्रं. एमएच 12 एनयु 5882 हिचेने चालक पोशि माळी यांच्यासह 8.45 वा. पंचनाम्याचे व सिलीगं लेबलींगचे साहीत्य, अॅन्थ्रासीन पावडरची सिलबंद शिशी, अल्ट्राव्हायलेट बॅटरी, लाख, सिल , लॅपटॉप, प्रिंटर, केबल, कार्ड रिडर, पडताळणी पंचनाम्यात वापरण्यात आलेले व सिलबंद केलेले मेमरी कार्डचे सिलबंद पाकीटे इ. सह रिकामे लिफाफे, गोंद व आवश्यक इतर स्टेशनरी साहीत्यासह ला.प्र.वि.कार्यालय पुणे येथुन रवाना झालो. आम्ही सर्व सासवड-जेजुरी-निरा मार्गाने को-हाळे खु वडगांव कडे रवाना होवुन प्रवासादरम्यान तक्रारदारास भेटण्याचे ठिकाण विचारता त्यांनी वडगांवच्या अलिकडे होळ फाटा येथे येण्यास सांगीतल्याने त्याप्रमाणे आंम्ही 11.00 वा. च्या सुमारास सदर ठिकाणी पोहोचलो असता तक्रारदार श्री. गायकवाड हे त्यांच्या निसान कार क्रं. एमएच 12 केजे 4582 हिचेने सदर ठिकाणी हजर होते. त्यांचे कारजवळ आमचे शासकीय वाहन नेवुन पार्क करुन शासकीय वाहनातुन चा.पोशि माळी यांना खाली उतरणेस सांगुन आंम्ही तक्रारदार श्री. गायकवाड यांना शासकीय वाहनात बसवुन त्यांचा व सापळा पथकाचा पुनश्च परीचय करवुन देवुन त्यांना पुर्वीचे पंच म्हणुन काम पाहीलेले पंच श्री. सोनवणे हे प्रकृती अस्वस्थतेमुळे उपलब्ध नसल्याचे अवगत करवुन देवुन सदर कारवाईत नव्याने दाखल पंच क्रं. 2 श्री. संदिप गायकवाड यांचा परीचय करवुन दिला. यानंतर आंम्ही तक्रारदार श्री. अविनाश गायकवाड यांनी दिनांक 14/10/2026 रोजी दिलेली लेखी तक्रार त्यांना दाखवुन त्यावरील हस्ताक्षर व सही त्यांचीच आहे काय याची खात्री केली असता त्यांनी होय असे सांगीतल्यावर सदरची तक्रार आंम्ही पंच श्री. संदिप गायकवाड यांना वाचणेस देवुन तक्रारदारास त्याची तक्रार कथन करणेस सांगीतली असता त्यानी लोकसेवक श्री. शेख, वनपाल यांचे विरोधात लाच मागणीची तक्रार कथन केली ती व पंच श्री. संदिप गायकवाड यांनी वाचन केलेली तक्रारदार यांचे हस्ताक्षरातील तक्रार एकच असल्याची पंच श्री. संदिप गायकवाड यांची खात्री झाल्यावर त्यांनी सदर तक्रारीवर तसेच सदर तक्रारीसोबतचे सहपत्रे यांवर दिनांक 23/10/2026 रोजीची दिनांकीत स्वाक्षरी केली. यानंतर तक्रारदार श्री गायकवाड यांना पंच क्र. 1 शेवाळे यांचेसोबत त्यांचे को-हाळे खु. येथील शेतात पाठवुन तेथे लोकसेवक श्री. शेख वनपाल यांची भेट घेवुन तक्रारदार श्री गायकवाड यांचेकडे लोकसेवकाची लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबत पुढील पडताळणी कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात येवुन पुढील कारवाई बाबत सर्वांना कळवुन तक्रारदार श्री. अविनाश गायकवाड, सापळा पथक व दोन्ही पंचांना पडताळणी वेळी घ्यावयाच्या दक्षतेच्या सविस्तर सुचना दिल्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयाकडून करण्यात येणा-या पडताळणी व सापळा कारवाईबाबत माहीती देवुन निवेदनांचे चित्रीकरणबाबत माहीती दिली. तसेच लोकसेवक व तक्रारदार यांचे भेटीच्या वेळी होणारे संभाषण हे आमचेकडील सोनी कंपनीचे व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्डीग केले जाणार असलेबाबत त्यांना कळवुन आमचेकडील ट्रॅपबॅग साहित्यामधून सोनी कंपनीचा व्हॉईस रेकॉर्डर काढून सदर व्हाईस रेकॉर्डरच्या कार्यपद्धतीची त्यांना माहीती देवुन यापुर्वी सापळा कारवाई करीता पडताळणी पंचनाम्या दरम्यान वापरण्यात आलेले व्हाईस रेकॉर्डरमधील सिलबंद करणेत आलेले मेमरी कार्ड असलेला कागदी सिलंबंद लिफाफा पंचांसमक्ष ट्रॅपबॅगमधुन काढुन सदर

सिलबंद लिफाफा फाडुन पडताळणी पंचनाम्यातील व्हाईस रेकॉर्डींग असलेले मेमरी कार्ड बाहेर काढुन त्याच्या पुढील बाजुस M ROCK 32 GB Micro SD HC I 10C व मागील बाजुस A2416MN004085154 MR-XY07/26 असे पंचांना व तक्रारदारास दाखवुन सदरचे मेमरी कार्ड सोनी कंपनीच्या व्हाईस रेकॉर्डरमधे टाकुन व्हाईस रेकॉर्डर ऑन करुन त्यात रेकॉर्डींग होणारे संभाषण मेमरीकार्ड मेमरीमधे सेव्ह होण्याची सेटींग करुन सदर व्हाईस रेकॉर्डर मेमरीकार्डात दिनांक 14/10/2026 रोजीच्या 4 फाईल संभाषण ध्वनीमुद्रीत असल्याची पंचाची व तक्रारदार यांची खात्री करुन सदर व्हॉईस रेकॉडर पोशि तावरे यांचे ताब्यात दिला. यानंतर पडताळणी निवेदनांचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येणार असल्यांचे पंच व तक्रारदारास कळवुन निवेदनाचे व्हिडीओ रेकॉर्डींग असलेल्या मेमरीकार्डचा सिलबंद लिफाफा पंचांसमक्ष फोडुन त्यांतील मेमरीकार्ड बाहेर काढुन पंचांना दाखविले ते सायस्टीक कंपनीचे 08 जीबी क्षमतेचे मायक्रो एस.डी.कार्ड असून त्याचे पुढील बाजूस Systic Micro SD HC c10 8GB व मागील बाजूस क्क CE MMFC215SAN-TO ZC SY-Z8/26 Made in Taiwan असे असल्याचे दिसून आले. सदरचे मेमरीकार्ड मपोशि माकर यांच्या व्हिवो मोबाईल हॅन्डसेटमधे टाकुन सदर मेमरीकार्डात दि.14/10/2026 रोजीचे निवेदनाची व्हिडीओ फाईल असल्याचे पंचांची व तक्रारदाराची खात्री करवुन सदर मोबाईलमधे रेकॉर्डींग होणारे व्हिडीओ मेमरीकार्ड मेमरीमधे सेव्ह होण्याची सेटींग करुन सदर मोबाईल फ्लाईट मोडमधे टाकुन मपोशि माकर यांच्या ताब्यात देवुन निवेदन घेतेवेळी त्यांना सदर मोबाईलमधे चित्रिकरण करण्यास सांगीतल्यावर आमच्या सुचनेवरून पोशि तावरे यांनी 11.50 वाजता व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार श्री गायकवाड व त्यानंतर पंच क्रं 1 श्री. शेवाळे व पंच क्र. 2 श्री. संदिप गायकवाड यांची पडताळणी कारवाई करीताची निवेदने व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करुन व्हॉईस रेकॉर्डर 12.02 वा. बंद केला. सदरवेळी मपोशि माकर यांनी त्यांचेकडील व्हिवो मोबाईल हॅन्डसेटद्वारे चित्रिकरण केले.

यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. शेख यांना भेटायला जाण्यापुर्वी कॉल करुन ते नक्की कुठवर आलेत ते विचारुन घेतो असे सांगीतल्याने तक्रारदार श्री. गायकवाड यांचे मोबाइल फोनवरुन लोकसेवक श्री. शेख यांना व्हाईस रेकॉर्डर ऑन करुन 12.04 व 12.05, कॉल केला असता त्यांनी कॉल घेतला नाही. 12.13 वा. लोकसेवक श्री. शेख यांनी तक्रारदारास कोर्टात असल्याचे सांगीतले तसेच 13.41 वा. येत असल्याचे सांगीतल्याने तक्रारदार श्री. अविनाश गायकवाड यांना व पंच श्री. शेवाळे यांना पडताळणी कारवाइ वेळी घ्यावयाच्या दक्षतेच्या सविस्तर सुचना देवुन 13.52 वा. रेकॉर्डर ऑन करुन तो कोणास दिसणार नाही अश्या पद्धतीने तक्रारदाराच्या बनियानला लावुन पंच क्रं. 1 श्री. शेवाळे यांचेसह तकारदार यांचे निसान कार क्रं. एमएच 12 केजे 4582 हिचेने को-हाळे खु. येथील तक्रारदाराचे शेतावर त्याचवेळी रवाना केले. आंम्ही व सापळा पथक असे पंच क्रं. 2 यांचेसह त्याच ठिकाणी थांबुन राहीलो असता काहीवेळाने तक्रारदार व पंच क्रं. 1 असे सदर ठिकाणी परत आले तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला तेव्हा 15.36 वाजले होते. त्यावेळी मी पंच क्र.1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी पंच क्र.2 यांचे समक्ष सांगितले की, "मी व तक्रारदार असे त्यांच्या कारने तक्रारदाराच्या को-हाळे खु. येथील शेतात गेलो. सदर ठिकाणी तक्रारदाराने त्यांची कार पार्क केली असता तेथे एक

मॅडम एका इसमासोबत उभ्या होत्या . सदरच्या मॅडम भुमरे मॅडम व शिपाई खोमणे असल्याचे तक्रारदार यांनी सांगीतले. त्यांचेसोबत काहीवेळ शेताचे जागेसंबंधाने चर्चा सुरु असतांना काहीवेळाने तेथे अजुन एक व्यक्ती आले. ते वनपाल श्री. शेख साहेब असल्याचे तक्रारदाराने कळविले. श्री. शेख साहेब यांनी तक्रारदार श्री. गायकवाड यांना माझ्याबाबत विचारता चुलतभाउ असल्याचे सांगीतल्यावर श्री. शेख साहेब व तक्रारदार यांच्यात शेतजमिन व फॉरेस्ट हद्य संबंधाने चर्चा झाल्यावर काहीवेळाने श्री. शेख साहेबांनी तक्रारदार श्री. गायकवाड यांना उजव्या हाताच्या अंगठा व पहील्या दोन बोटांनी पैशाचा इशारा करुन हाताचा पंजा हलवुन पैशाचे काय या अर्थी इशारा केला असता तक्रारदार श्री. गायकवाड यांनी त्यांना "नाय नाय त्यानच काय नाय, त्यांच हरकत नाही, .. तुंम्ही आता कुठे गाठ घेवु ..कुठे येवु" असे विचारता श्री. शेख यांनी " आता.. कसय साहेब ..आंम्ही आमचा शब्द पाळलाय.., त्यांनी शब्द दिलाय मला.. त्या हिशोबानं.. असे बोलुन "याना तिकडे को-हाळ्यात,,,कठिण पुल.. हाय तिथ भरपुर वेळ..असे सांगीतल्यावर श्री. शेख यांनी पुन्हा बोटांनी पैशाचा इशारा केला असता श्री. गायकवाड यांनी त्यांना "त्या..म्हणता तसे केले.. दहाचा विषय होता" असे म्हणल्यावर श्री. शेख यांनी "हं" असे म्हणल्यावर तक्रारदार श्री. गायकवाड यांनी "चार त्याने दिले ना, मला शंका आली दिले का ना नाय" असे म्हणल्यावर श्री. शेख साहेबांनी "हो" असे म्हणले. त्यावर श्री. गायकवाड यांनी "चार पोहोचलेत.. वरती सहा देतो मी आणुन" असे म्हणल्यावर श्री. शेख यांनी "हं" असे म्हणुन कठिणपुलावर पैसे घेवुन येण्यास माझ्या समक्ष सांगीतले. अशी हकिकत पंच क्र.1 यांनी सांगितल्यानंतर मी तक्रारदार यांना घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी देखील पंच क्र.1 यांचे प्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर मी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये पडताळणी कारवाई दरम्यान ध्वनिमुद्रीत संभाषणाची फाईल फास्ट रिव्हर्स-फॉरवर्ड करुन ऐकुन तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकत बरोबर असल्याची खात्री केली.

सदर वेळी झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. शेख यांनी तक्रारदाराकडे उर्वरीत 6,000/- रुपयांची लाचेची मागणी करुन कठिणपुलावर घेवून येण्यास सांगितल्याने पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार मी तक्रारदार श्री. गायकवाड यांना लोकसेवक श्री. शेख यांना देण्यात येणा-या लाचेची रक्कम हजर करण्याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी त्यांचे बचतीमधील रक्कम रु.6,000/- (रु.500/-दराच्या भारतीय चलनातील एकुण 12 नोटा) आमचे समक्ष हजर केल्या असता सदर नोटांचे नंबर पंच क्रं. 2 यांच्या मदतीने मपोशि माकर यांनी एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यानंतर मी दिलेल्या सुचनेप्रमाणे चालक पोशि माळी यांनी शासकीय वाहनामध्ये तक्रारदार व दोन्ही पंचांना अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे गुणधर्म समजावून सांगितले की, अँथ्रासिन पावडर नेहमीच्या प्रकाशामध्ये पाहीली असता तिचेवर कोणतीही चकाकी दिसून येत नाही परंतु अंधारामध्ये तिचेवर अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश टाकला असता तिचेवर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून येते. पोशि माळी यांनी त्याबाबतची प्रात्यक्षिके करून दाखविली. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेल्या लाच रक्कमेच्या नोटांना पोशि माळी यांनी अँथ्रासिन पावडर लावुन आमचे सुचनेवरुन सदर लाच रक्कम तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या छातीवरील डाव्या बाजुचे खिशात अलगद ठेवल्या. उर्वरीत पावडर शिशीमधे ठेवुन सदर शिशी सिलबंद करुन त्यावर आमचे व पंचांचे सहीचे लेबल लावुन सिलबंद केले. यानंतर पोशि

माळी यांना पाण्याने हात स्वच्छ धुवण्यास लावुन त्यांना मनुष्यबळाचे अभावी कारवाईमधे सामील करुन त्यांना कारवाईवेळी वाहनातच थांबुन राहण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी दिलेल्या सुचनेप्रमाणे पोशि तावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर 16.56 वाजता चालू करून त्यात तक्रारदार व दोन्ही पंचांचे सापळा कारवाईचे निवेदने रेकॉर्ड केली. तसेच मपोशि माकर यांनी त्यांचेकडील मोबाईलमधे चित्रीकरण केले. यानंतर तक्रारदारास लोकसेवक यांनी कठिणपुलावर बोलावलेले असल्याने होळफाटा येथुन आंम्ही सापळा पथक, पंच व तक्रारदार असे 17.10 वा. आपापले वाहनाने रवाना होवुन को-हाळे बद्रुक गावाच्या बाहेर रस्त्याच्या किनारी निर्जन जागी थांबुन तक्रारदारास पुनश्च शासकीय वाहनात बसवुन कठिणपुल येथे जाणेपुर्वी व्हाईस रेकॉर्डर ऑन केल्यावर तक्रारदाराने लोकसेवक श्री. शेख यांना दोन वेळा कॉल केला असता लोकसेवक श्री. शेख यांनी कॉल उचलला नाही. म्हणुन तक्रारदार श्री. गायकवाड यांनी आंम्ही कठिणपुल येथे जावुन श्री. शेख साहेबांना पुन्हा फोन करुन भेट घेतो. असे सांगीतल्याने तक्रारदार श्री. गायकवाड यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बनियान कोणासही संशय येणार नाही अशा रितीने व्हाइस रेकॉर्डर लावुन पंच क्रं. 1 यांचेसह सापळा कारवाईतील दक्षतेच्या व लाच स्विकारणी इशा-याची चष्मा घालण्याची सुचना देवुन 17.28 वा. च्या सुमारास व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्याचवेळी कठिणपुल येथे त्यांचे निसान कार नं. एमएच 12 केजे 4582 हिचेने रवाना करुन आंम्ही त्यांचे पाठोपाठ रवाना झालो. आंम्ही सापळा पथक पंच क्रं. 2 सह कठिणपुलाचे अलिकडे पोहोचुन वाहनातुन उतरुन तक्रारदार यांना नजरेच्या टप्प्यात ठेवुन त्यांचे हालचालींवर लक्ष ठेवुन असतांना तक्रारदार आमचेकडे पंच क्रं. 1 यांचेसह जवळ येवुन फोन आल्याचा इशारा केल्याने त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर 17.36 वा. च्या सुमारास बंद करुन ताब्यात घेवुन त्यांना हकिकत विचारता तक्रारदार यांनी कळविले की, त्यांना श्री. शेख यांचा सापळा कारवाई दरम्यान फोन आला . त्यांनी मला सांगीतले की मला बारामतीवरुन आमच्या वरीष्ठ मॅडमने ऑफीसला बोलावले आहे म्हणुन मी निघुन आलो असुन आता पंचायत समितीजवळ आहे, त्यावर मी त्यंाना मी तिकडे येवु का असे विचारता त्यांनी या ऑफीसला आहे असे सांगीतले, तरी आपण पुढिल सापळा कारवाई बारामती येथे जावुन करु असे सांगीतल्याने तक्रारदार यांचे सह आंम्ही सापळा पथक व पंच असे शासकीय व तक्रारदाराचे वाहनाने कठिणपुल येथुन 17.45 वा. रवाना होवुन वनपरीक्षेत्र अधिकारी कार्यालय, बारामतीजवळील आरटिओ कॉर्नर येथे 18.30 पोहोचलो. सदर ठिकाणी पोहोचल्यावर तक्रारदार यांना शासकीय वाहनात बसवुन 18.39 वा. व्हाईस रेकॉर्डर ऑन करुन 18.40 व 18.52 च्या सुमारास तक्रारदाराचे मोबाइलवरुन लोकसेवक श्री. शेख यांचे मोबाईल फोनवर कॉल केला असता त्यांचा फोन स्विच ऑफ लागला म्हणुन त्यांचे फोनची वाट पाहीली परंतु लोकसेवक शेख यांचा फोन न आल्याने पुढिल कारवाई श्री शेख व माझा संपर्क झाल्यावर उद्या करु असे तक्रारदाराने सांगीतल्याने तक्रादारास योग्य त्या गोपनियतेच्य सुचना देवुन सर्वानुमते सापळा कारवाई स्थगीत करुन बारामती येथुन 19.15 वा. निघुन ला.प्र.वि.पुणे कार्यालय येथे 21.30 वा. पोहोचुन सापळा स्थगीती पंचनाम्याची कारवाई दिनांक 24/10/2026 रोजी 02.00 वा. पुर्ण करुन पंचांना व सापळा पथकास दिनांक 24/10/2026 रोजी सकाळी 10.00 वा. ला.प्र.वि.पुणे कार्यालयात हजर राहण्याच्या सुचना दिल्या. सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आलेला आहे.

दिनांक 24/10/2026 रोजी दोन्ही पंच व सापळा पथक असे ला.प्र.वि.पुणे येथे 10.00 वा. आमचे समक्ष हजर झाले असता त्यांना झालेल्या घडामोडींबाबत पुनश्च अवगत करवुन देवुन तक्रारदार यांना

आंम्ही कॉल करुन माहीती घेता 12.26 वा. च्या सुमारास तक्रारदार श्री. गायकवाड यांनी आंम्हाला कळविले की, श्री. शेख यांचेसोबत त्यांचे फोनवरुन बोलणे झाले असता श्री. शेख यांनी उद्या कठिणपुलावर 11.00 ते 12.00 च्या सुमारास भेटायला बोलावले आहे असे तक्रारदाराने कळविल्याने सर्वानुमते कारवाई स्थगीत करण्यात येवुन पंचांना दिनांक 25/10/2026 रोजी सकाळी 08.30 वा. या कार्यालयात हजर राहण्याच्या व गोपनियतेच्या सुचना दिल्या.

आंम्ही दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने दिनांक 25/10/2026 रोजी सकाळी 08.30 वा. पंच, सापळा पथक व आंम्ही ला.प्र.वि.कार्यालय पुणे येथे हजर झालो. चालक पोशि माळी यांच्या ऐवजी चालक श्रेणी पोउपनिरी श्री. चव्हाण यांना पथकात सामील केल्याने त्यांचा सापळा पथकास व पंचांस परीचय करुन देवुन या कारवाई दरम्यान घडलेल्या घडामोडींची पुनश्च उजळणी करुन आंम्ही , पंच व सापळा पथक असे शासकिय सुमो वाहन क्रं. एमएच 12 एनयु 5882 हिचेने चालक श्रेणी पोउपनिरी चव्हाण यांच्यासह 8.45 वा. पंचनाम्याचे व सिलीगं लेबलींगचे साहीत्य, अॅन्थ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कमेचा सिलबंद लिफाफा, अॅन्थ्रासीन पावडरची सिलबंद शिशी, अल्ट्राव्हायलेट बॅटरी, लाख, सिल , लॅपटॉप, पिं्रन्टर, केबल, कार्ड रिडर, काळा कपडा, पडताळणी पंचनाम्यात वापरण्यात आलेले व सिलबंद केलेले मेमरी कार्डचे सिलबंद पाकीटे इ. सह रिकामे लिफाफे, गोंद व आवश्यक इतर स्टेशनरी साहीत्यासह ला.प्र.वि.कार्यालय पुणे येथुन रवाना झालो. आम्ही सर्व सासवड-जेजुरी-निरा मार्गाने को-हाळे खु्‌ वडगांव कडे रवाना होवुन प्रवासादरम्यान तक्रारदारास भेटण्याचे ठिकाण विचारता त्यांनी वडगांवच्या अलिकडे होळ फाटा येथे येण्यास सांगीतल्याने आंम्ही 11.30 वा. च्या सुमारास सदर ठिकाणी पोहोचलो असता 12.00 वा. तक्रारदार श्री. गायकवाड हे त्यांच्या निसान कार क्रं. एमएच 12 केजे 4582 हिचेने सदर ठिकाणी आले. त्यांचे वाहन पार्क करुन ते शासकीय वाहनाजवळ आले असता चा.श्रे.पोउपनिरी चव्हाण यांचा त्यांना परीचय करवुन देवुन चालक यांना शासकीय वाहनातुन खाली उतरणेस सांगुन आंम्ही तक्रारदार श्री. गायकवाड यांना शासकीय वाहनात बसवुन त्यांचा व सापळा पथकाचा पुनश्च परीचय करवुन देवुन त्यांना श्री. शेख यांचेसोबतचे चर्चेबाबत विचारता त्यांनी श्री. शेख यांना कॉल केला असता त्यांनी कॉल रिसीव्ह केला नाही असे कळविल्याने पुढील कारवाई बाबत सर्वांना सुचना दिल्या. यानंतर पडताळणी व सापळा कारवाईकरीता वापरणेत आलेले सिलबंद लिफाफ्यातील पडताळणी पंचनाम्यातील व्हाईस रेकॉर्डींग असलेले मेमरी कार्ड बाहेर काढुन त्याच्या पुढील बाजुस M ROCK 32 GB Micro SD HC I 10C व मागील बाजुस A2416MN004085154 MR-XY07/26 असे पंचांना व तक्रारदारास दाखवुन सदरचे मेमरी कार्ड सोनी कंपनीच्या व्हाईस रेकॉर्डरमधे टाकुन व्हाईस रेकॉर्डर ऑन करुन त्यात रेकॉर्डींग होणारे संभाषण मेमरीकार्ड मेमरीमधे सेव्ह होण्याची सेटींग करुन सदर व्हॉईस रेकॉडर पोशि तावरे यांचे ताब्यात दिला. यानंतर सापळा निवेदन व कारवाईचे पुढिल व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येणार असल्याने निवेदनाचे व्हिडीओ रेकॉर्डींग असलेल्या मेमरीकार्डचा सिलबंद लिफाफा पंचांसमक्ष फोडुन त्यांतील मेमरीकार्ड बाहेर काढुन पंचांना दाखविले ते सायस्टीक कंपनीचे 08 जीबी क्षमतेचे मायक्रो एस.डी.कार्ड असून त्याचे पुढील बाजूस Systic Micro SD HC c10 8GB व मागील बाजूस CE MMFC215SAN-TO ZC SY-Z8/26 Made in Taiwan असे असल्याचे दिसून आले. सदरचे मेमरीकार्ड मपोशि माकर यांच्या व्हिवो मो◌ेबाईल हॅन्डसेटमधे टाकुन सदर मोबाईलमधे रेकॉर्डींग होणारे व्हिडीओ मेमरीकार्ड मेमरीमधे सेव्ह होण्याची सेटींग करुन सदर मोबाईल फ्लाईट मोडमधे

टाकुन मपोशि माकर यांच्या ताब्यात देवुन निवेदन घेतेवेळी व सापळा कारवाईतील पुढिल चित्रीकरणाच्या सुचना देवुन तक्रारदार श्री. गायकवाड यांना व पंचांना तसेच सापळा पथकास पुढिल कारवाई च्या सुचना देत असतांना लोकसेवक श्री शेख यांचा मोबाईल नंबर 8767172098 यावरुन तक्रारदार यांना त्यंाचा मोबाईल नंबर 9960037306 यावर 12.57 वा. कॉल आला असता आंम्ही पोशि तावरे यांना तात्काळ व्हाईस रेकॉर्डर ऑन करुन तक्रारदारास स्पिकर ऑन करुन बोलणे करण्यास सांगीतले असता संभाषणा दरम्यान लोकसेवक श्री. शेख यांनी तक्रारदारास माळेगांव पंपाजवळ भेटण्यास बोलावले. म्हण्ुन आंम्ही तात्काळ तक्रारदार व पंचांचे निवेदने 13.05 ते 13.11 वा. ध्वनीमुद्रीत व चित्रीकरण करुन लोकसेवक श्री. शेख यांनी तक्रारदारास माळेगांव येथे बोलावलेले असल्याने व्हाईस रेकॉर्डरच्या बॅटरी बॅकअपच्या अनुषंगाने माळेगांव पुर्वी पणदरेजवळ काही अंतरावर थांबुन तेथुन पुढिल कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर ठिकाणी कारवाईकरीता दुचाकीची आवश्यकता असल्याने तक्रारदार यांना एक दुचाकी उपलब्ध करुन देणेस कळविले असता त्यांनी को-हाळयात त्यांच्या गडयाची दुचाकी असुन त्याची चावी त्यांच्याकडे असल्याचे सांगीतल्याने 13.15 वा. होळ फाटा येथुन आंम्ही, सापळा पथक व दोन्ही पंच असे शासकीय वाहनाने व तक्रारदार हे त्यांच्या नमुद निसान कारने रवाना झाले. को-हाळे येथे पोहोचल्यावर तक्रारदाराने रस्त्याच्या कडेला पार्क असलेली दुचाकी एमएच 42 एजी 7288 हि उपलब्ध करुन दिली असता ती पोशि तावरे यांनी चालवण्यास घेवुन सापळा पथक , पंच, तक्रारदार असे आंम्ही सर्व पणदरे गावाच्या पुढे काही अंतरावर रस्त्याच्या कडेस सुरक्षित ठिकाणी पोहोचलो. सदर ठिकाणी तक्रारदार , पंच, सापळा पथकास संविस्तर सापळा कारवाईच्या सुचना देवुन लोकसेवक श्री. शेख यांना देणेकरीता तक्रारदाराने यापुर्वी सापळा कारवाईत हजर केलेली 6,000/- रुपयेचा लाच रक्कमेचा सिलबंद लिफाफा फोडुन त्यातील अॅन्थ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम चालक श्रेणी पोउपनिरी श्री. चव्हाण यंाचेकरवी बाहेर काढुन सदरची अॅन्थ्रासीन पावडर लावलेली रक्कम तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या वरील खिशात अलगद ठेवुन चालक श्रे.पोउनिरी श्री. चव्हाण यांना पाण्याने हात स्वच्छ धुवण्यास लावुन त्यांना मनुष्यबळाचे अभावी कारवाईमधे सामील करुन त्यांना सापळा पथक सापळा लावुन थांबेल त्यावेळी कारवाईवेळी वाहनातच थांबुन राहण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार यांना पंच क्रं. 1 श्री. शेवाळे यांचेसह रवाना होवुन लोकसेवकाने लाच रक्कम स्विकारल्यावर डाव्या हाताने चष्मा डोळयांवर लावण्याची इशारा सुचना दिल्यावर उर्वरीत सापळा पथक व पंच क्रं. 2 यांना दक्षतेच्या सुचना दिल्या. मी दिलेल्या सुचनेप्रमाणे पोशि तावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर 13.52 वा. सुरु केल्यावर तक्रारदार श्री.गायकवाड यांच्या शर्टच्या आतील बनियानला कोणासही संशय येणार नाही अश्या पद्धतीने लावुन तक्रारदार श्री. गायकवाड यांच्यासोबत पंच क्रं. 1 यांना देवुन त्यांच्या चारचाकी वाहनाचे मागे तक्रारदाराने हजर केलेली दुचाकी आंम्ही चालवण्यास घेवुन सोबत पंच क्रं. 2 यांना मागे बसवुन तसेच पोशि तावरे व मपोशि माकर असे शासकीय सुमो वाहनाने त्याचवेळी रवाना झालो असता तक्रारदार श्री. गायकवाड यांनी माळेगांव आयटीआय च्या विरुद्ध बाजुस असलेल्या एका हॉटेलजवळ आपले वाहन थांबवुन त्यातुन तक्रारदार श्री. गायकवाड व पंच क्रं. 1 श्री. शेवाळे यांच्यासह खाली उतरले व सदर हॉटेलच्या शेडखाली जावुन बसले. आंम्ही काही अंतरावर आमचेकडील दुचाकी पार्क करुन इतर सापळा पथक शासकीय वाहनातुन उतरुन सदर हॉटेलच्या आजुबाजुस आंम्ही सर्वजण कोणास संशय येणार नाही अश्या पद्धतीने समयसुचकतेप्रमाणे

सापळा लावुन थांबलो. काहीवेळाने तिथे काळे जर्किंग घातलेला एक इसम आला व तो श्री. गायकवाड व पंच क्रं. 1 यांचे जवळ जावुन खुर्चीत बसला. त्यांचेत व तक्रारदारात काहीवेळ चर्चा झाल्यावर तक्रारदार श्री. गायकवाड यांनी त्यांच्या शर्टच्या वरील डाव्या बाजुच्या खिशातुन लाच रक्कम काढुन समोर बसलेल्या इसमाकडे दिल्यावर आपल्या शर्टला लावलेला चष्मा काढुन डोळ्यावर लावुन लाच स्विकारल्याचा नियोजित इशारा केला असता आंम्ही सर्व सापळा पथक तात्काळ सदर ठिकाणी पोहोचलो असता पंच क्रं. 1 यांनी सदर इसम वनपाल श्री. शेख असल्याचे सांगुन त्यांनीच लाच रक्कम डावे हाताने स्विकारल्याचे सांगीतले. त्यानंतर आंम्ही सदर इसमाचे दोन्ही हात त्याचे मनगटाजवळ घट्ट पकडुन ठेवले . त्यावेळी सदर इसम खुप घाबरलेला होता. पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून तो बंद केला. ती वेळ 14.17 वाजताची होती. यानंतर पोशि तावरे यांनी तक्रारदार श्री. अविनाश गायकवाड यांना लांब थांबणेस सांगुन नंतर लोकसेवक श्री. शेख यांचे दोन्ही हात मनगटाजवळ दोन्ही हात पकडले. त्यानंतर मपोशि माकर यांनी त्यांचेकडील व्हिवो मोबाईल हॅन्डसेटव्दारे व्हिडीओ शुटींग चालू केले. यानंतर लोकसेवक श्री. शेख यांना आंम्ही आमचे ओळखपत्र दाखवुन आमचा व सापळा पथकाचा परीचय देवुन त्यांचे नांव पत्ता विचारता त्यानी आपले नांव जहिर सिराज शेख , वय 47 वर्षे, वनपाल, करंजे राउंन्ड ऑफीसर, वनपरीक्षेत्र कार्यालय, बारामती रा. के/ऑ. श्री. शेखर गाडे, बी/5, निशीका अपा. जळोची रोड, बारामती असे असल्याचे सांगीतले. त्यावेळी त्यांना आंम्ही होत असलेल्या कारवाई बाबत विश्वासात घेवुन माहिती दिली. लोकसेवक श्री. शेख यांना आंम्ही काळ्या कपड्याने कृत्रिम अंधार करुन अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये दोन्ही पंच, सापळा पथक व माझे हाताची तपासणी करून दाखविली असता कोणाच्याही हाताला अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली नाही. यानंतर लोकसेवक श्री. शेख यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांच्या पॅन्टच्या पुढिल बाजुच्या डाव्या खिशातुन लाच रक्कम काढून समोरील टेबलावर ठेवली. सदर रक्कम पंच 2 यांना ताब्यात घेण्यास सांगुन सदर लाच रक्कम व लाच रककम नोटा नंबर लिहीलेल्या कागदावरील नोटांचे नंबर पंच क्रं. 1 व 2 यांच्या मदतीने तपासले असता ते तंतोतंत जुळुन आले. सदर लाचेच्या नोटांची अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात काळ्या कपड्याखाली कृत्रीम अंधारात तपासणी केली असता त्यावर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर लोकसेवक शेख यांचे दोन्ही हातांची पंचासमक्ष अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये काळ्या कपड्याने कृत्रीम अंधार करुन तपासणी केली असता त्यांचे डावे हाताच्या सर्व बोटांचे पे-यांना अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच त्यांनी परीधान केलेल्या पॅन्टच्या डावे बाजुचे पुढिल खिशाची अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात काळ्या कपड्याखाली कृत्रीम अंधारात तपासणी केली असता सदर खिशाचे कडांवर व आतील बाजुस फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली.

त्यानंतर मी तक्रारदार यांना बोलावून काळ्या कपड्याने कृत्रीम अंधार करुन लोकसेवक शेख यांचे समक्ष कृत्रिम अंधारामध्ये अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तक्रारदार श्री. अविनाश गायकवाड यांचे हाताची तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताचे सर्व बोटाचे पे-यांना अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.

त्यानंतर मी पंच क्र.1 यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता पंच क्र. 1 यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे सापळा कारवाईकरीता तक्रारदार यांचे

चारकचाकी वाहनाने रवाना होवुन माळेगांव पेट्रोलपंपाकडे येत असतांना लोकसेवक श्री. शेख यांचा तक्रारदार श्री. गायकवाड यांना कॉल आला असता गायकवाडांनी त्यांनी माळेगांव इंजिनीअरींग कॉलेज येथे आल्याचे सांगीतले म्हणुन लोकसेवक श्री. शेख यांनी त्यांना तिथेच थांबा आलो असे सांगीतल्यावर काही वेळात आंम्ही इंजिनिअरींग कॉलेजच्या बाजुला असलेल्या शिवकृपा हॉटेलजवळ पोहोचलो. तक्रारदार श्री. गायकवाड यांनी त्यांची गाडी सदर हॉटेलच्या समोर पार्क करुन आंम्ही दोघेही गाडीतुन खाली उतरुन हॉटेलमधे जावुन बसलो असता श्री. शेख साहेब तिथे मोपेडवरुन आले व आमच्यात खुर्चीवर बसले. तक्रारदार श्री. गायकवाड यांनी लोकसेवक श्री. शेख यांना नमस्कार केल्यावर त्यांच्यात शेतीचे बंद पडलेल्या कामासंबंधाने चर्चा झाली यानंतर तक्रारदार गायकवाड शेख यांना " माझ काम थांबलय, एक महिना गेलाय" "ते दहा हजार रुपये सांगीतले होते.. असे म्हणल्यावर श्री. शेख यांनी "मी तुंम्हाला मोकळ्या हातानं सहकार्य केलय" आता कसा विषयय तुंम्ही म्हणत असाल तर तेही रिटर्न करायला सांगतो" असे म्हणल्यावर तक्रारदार " नाय नाय अहो साहेब रिटर्न नका करु पैसे" असे बोलुन त्यांच्यात तक्रारदाराच्या कामासंबंधाने चर्चा झाल्यावर लोकसेवक श्री. शेख " समजुन घ्या मी तुंम्हाला हक्कानं मागण" असे बोलले असता श्री. गायकवड यांनी "यस सर.. तुंम्ही त्या दिवशी मागीतले त्या दिवशी नव्हते माझ्याकडे, दहा नसतील तर मी काय विषयच घेतला नसता.. चारच हजार होते., तरी बी मी फोनवर मी बारामतीत गाठ घेतो, बाकीचे सहा हजार देतो..आता हे सहा अन ते तिन चार दहा झाले ,, मॅडमचे नाय ना काय वेगळे" असे बोलल्यावर श्री. शेख हे "नाय नाय" असे बोलले त्यावर तक्रारदार " ह्याच्यातचय ना .. नाहीतर ते" असे म्हणले त्यावर श्री. शेख यांनी "नाय नाय" आपली काय चर्चा झाली ते फायनल सांगुन देतो व्यवस्थीत फक्त जुळवुन घ्या " असे बोलुन तक्रादार लाच रकमेची मागणी केली. यानंतर तक्रारदार यांनी त्यांच्या शर्टच्या वरील खिशातुन लाच रक्कम बाहेर कादुन लोकसेवक श्री. शेख यांचे समोर टेबलावर ठेवली असता श्री. शेख यांनी सदरची रक्कम डाव्या हाताने उचलुन त्यांच्या पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन स्विकारली असता तक्रारदाराने डोळ्यांवर चष्मा लावुन लाच रक्कम स्वीकारलेबाबत पुर्वनियोजीत इशारा केला असता सापळा पथक व आपण येवून वरिलप्रमाणे पुढील कारवाई केल्याचे पंच क्र.1 यांनी सांगितले. त्यानंतर तक्रारदार श्री. अविनाश गायकवाड यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतबाबत विचारणा केली असता त्यांनी पंच क्र.1 यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली. पंच क्रं. 1 व तक्रारदार यांनी श्री. शेख यांनी मागणी केल्यावर लाच रक्कम त्यांचेसमोर टेबलवर ठेवल्याचे व तेथुन श्री. शेख यांनी डाव्या हाताने उचलुन पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवल्याचे सांगीतल्याने सदर टेबलाची पाहणी केली असता श्री. बसलेल्या खुर्ची समोरील टेबलाच्या जागेची काळ्या कपड्याने कृत्रीम अंधार करुन पाहणी केली असता सदर ठिकाणी अँन्थ्रासीन पावडरची निळसर फिक्कट चकाकी दिसुन आली. यानंतर सदर ठिकाणचे जागेचा कच्चा हातनकाशा काढुन चर्तुसिमा घेवुन पुढिल पंचनामा कारवाई करणे सदर ठिकाणी सोईस्कर नसल्याने लोकसेवक श्री. शेख यांची अंगझडती घेवुन त्यांचे ताब्यात मिळुन आलेली लाच रक्कम व इतर चिजवस्तु ताब्यात घेवुन माळेगांव पोलीस ठाणे येथे 14.42 वा. आलो. सदर ठिकाणी प्रभारी अधिकारी यांना संपर्क करुन त्यांना लाप्रवि पुणे कडील झालेल्या कारवाईची कल्पना देवुन कारवाई कामी कक्ष उपलब्ध करुन देणेस सांगीतले असता त्यांनी पोलीस ठाण्यात कक्ष उपलब्ध करुन दिले असता आंम्ही सदर ठिकाणी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये सापळा कारवाईदरम्यान झालेल्या

संभाषणाची ध्वनिमुद्रीत फाईल रिव्हर्स फॉरवर्ड करुन ऐकून खात्री केली. वरिल सर्व घटनेचा सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे.
तरी दि.23/10/2026 रोजी 13.41 ते 15.36 वा. लाच मागणी पडताळणी व दिनांक 25/10/2026 रोजीचे 13.52 ते 14.17 वा. चे सापळा कारवाई दरम्यान वनपाल श्री. जहिर सिराज शेख यांनी तक्रारदार श्री. अविनाश वामन गायकवाड हे त्यांचे मालकीच्या शेती जमीनीध्ये निरा नदीच्या पात्रातुन मातीची भरणा करीत असतांना त्यांचे काम बंद करुन सदरची जागा फॉरेस्टच्या मालकिची असल्याचे सांगुन माती भराव करण्यास मज्जाव करुन कारवाई न करता काम सुरु ठेवण्यासाठी वनरक्षक भुमरे मॅडम व स्वतःकरीता 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी 4,000/- रुपये स्विकारल्याचे मान्य करुन दिनांक 25/10/2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान 6,000/- रुपये लाच रक्कम हॉटेल शिवकृपा, माळेगाव आयटीआय गेटचे समोर, बारामती निरा रोड, माळेगाव ता. बारामती जि. पुणे येथे स्विकारतांना 14.17 वा. पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले. म्हणून माझी त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 नुसार कायदेशीर फिर्याद आहे.
समक्ष हा फिर्यादी जबाब दिला

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Kuldeep Dattatray Sankpal (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

पोलीस ठाणे अमलदार
मालेगाव पोलीस स्टेशन

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Kuldeep Dattatray Sankpal

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): API

26/11/20

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सेंमी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1979 | | | | चेचक: होय |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**